Monday, October 21, 2024
2:12 PM

# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २१/१०/२०२४

एकुण गुन्हे

| अ. क्र. | पो.ठाणे<br>अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे गाडगेनगर<br><br>अप क्र ८७७/२०२४ कलम ११८(२) bns | आझाद नगर गौसिया मज्जिद के पिछे अमरावती | दि २०.१०.२०२४ रात्री २०.३० वा दाखल ता वेळ- दि २०.१०.२०२४ सकाळी २२.५४ वा दरम्यान | सय्यद जमिर सय्यद नजीर वय ४४ वर्ष व्यवसाय चालक रा अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घराबाहेर खुर्चीवर बसुन मोबाईल बघत असतांना आरोपी अचानक आला व फिर्यादीचे उजव्या खांद्यावर बगल चे जवळ चाकुने वार करुन गंभीर जखमी केले.फिर्यादी जोरजोराने ओरडला असता आरोपी तेथुन पळुन गेला. अशा फिर्यादीचे बयाण वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 2 | पोलीस स्टेशन नागपुरी गेट **अपक्र. 388/2024 कलम 118(1) 352, 351(2) बी. एनएस 2023** | अमरावती | दि. 20/10/2024 चे14/00 वा दाखल ता. वेळ दि. 20/10/2024 चे 18/37 वा | फैजल खान जमिल खान वय 30 वर्ष रा. गौर नगर अमरावती | मोसीम खान मजीद खान वय 30 वर्ष रा. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे. की नमुद घटणा ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी घरी वाशींग मशीन धुवत असता त्याचे पाणी खाली पडत होते आरोपीयाच्या अंगावर पाण्याचे शितोडे उडाले असता त्याने म्हटले माझे अंगावर पाण्याचे शितोडे उडत आहे वरुन फिर्यादी वाशिंग मशीन घुणे बंद करुन खाली आला आरोपीने म्हटले की तुझे घर समोर आहे. हे पाणी माझ्या घरा समोर पडत आहे त्याला पाईप लाव नाही तर तुला मारेल असे बोलुन शिवीगाळ करुन आरोपीने हातातील फावड्याने फिर्यादीच्या काकाला पठीवर मारले तेव्हा फिर्यादी मध्ये आल्यावर फिर्यादीच्या डोक्यावर फावडे लागु डोक्यातुन रक्त निघाले व फिर्यादीच्या काका ला पाठीवर मुक्का मार लागला अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पोलीसस्टेश ननागपुरीगे ट अप क्र. 389/2024 कलम 305 बीएनएस 2023 | दुर्गा देवी मंदिर मसानगंज अमरावती | दि. 13/10/2024 चे सकळी 06/00 वा ते दुपारी 13/00 वा दरम्याण दाखल ता. वेळ दि. 20/10/2024 चे 20/15 वा | राहुल अमृत लाल बमने वय 43 वर्ष रा. अमरावती | हकीकत अशा प्रकारे फिर्यादी हे नमुद पत्यावर राहत असुन दुर्गा देवी मंदिरा मध्ये ट्रस्ट मध्ये सदस्य असुन अध्यक्ष निरज साहु हे आहे. मंदिराचे दरवाजे उघडने व बंद करणे फिर्यादी पाहतात यातील नमुद घटणा ता. वळी व ठीकाणी यातील फिर्यादीने सकळी 06/00 वा दर्शनासाठी लॉंक उघडले असता व फिर्यादी दुपारी 13/00 वा मंदिराचे लॉंक लावण्याकरीता गेले असता मंदीरातील दुर्गादेवीची वरची चांदीची छत्री किमंत अंदाजे 19,000/-रु दिसुन आली नाही कोणी तरी अज्ञात चोराने मंदिरातील चांदीची छत्री चोरुन नेली आहे. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोस्टे वलगाव अप क्र. 306/2024 कलम 303(2) BNS | शमशान भुमी समोर, वलगाव | दि.16/10/2024 चे 14/00 वा. दरम्याण दाखल दि. दि. 20/10/2024 चे 18/48वा. | सुरेन्द्र रुपरावजी आवारे वय 54 वर्ष, व्यवसाय- शेती रा. जवळा शाहपुर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि 15/10/24 रोजी राहते घरी गळफास लावुन आत्महत्ता केली होती. दि 16/10/2024 रोजी दुपारी 02/00 वा माझे सासरे यांचे मयती करीता मी माझी लहान भाउ .चांदुर बाजार जिल्हा अमरावती त्याचे नांवे असलेली मोटार सायकल क्र .MH-27-AK-8307 स्पेल्डर काळ्या रंगाची त्यांचे चेचीस क्र MBLHA10EJAHC65204 इजिन क्र HA10EAAHCB6645 त्याची अंदाजे किमत 10,000/- ने आलो होतो त्याचे अंतीम विधीचे कार्यक्रम करीता वलगाव येथे शमशानभुमी येथे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल | | | | आनले तेव्हा मी माझी मोटार सायकलही वलगाव ते परतवाडा रोड वर शमशानभुमी येथे लाक न करतो उभी केली होती अंतीम विधी पार पाळल्याकरीता गेलो नंतर मी माझे सासरे यांचे घरी जाण्या करीता माझे मोटार सायकल जवळ गेलो असता माझे लहान भाउयांची नावे असलेली मोटार सायकल ही तेथे दिसुन आली नाही मीतीचे आजु बाजुला तसेच वलगाव परिसरात शोध घेतले परंतु गाडी मिळुन आली नाहीती मोटार सायकल कोणी तरी अज्ञात चोराने चोरुन नेली असावी. आजदि. 20/10/2024 रोजी पोलीस स्टेशन वलगाव येथे येवुन माझी गाडी कोणी तरी अज्ञात चोराने चोरुन नेली आहे त्या अज्ञात चोरा विरुध्द कार्य वाही व्हावी करीता रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादी चाजबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे वलगाव अपक्र. 305/2024 कलम 303(2) BNS | दर्यापुर रोडवर, रशिद भाई यांचे पोल्ट्री फॉर्म जवळ. | .14/10/2024 चे 10/00 ते 16/30 वा. दरम्याण<br><br>दाखल .दि. 20/10/2024 चे 17/35 वा. | अब्दुल वहीद अब्दुल कादीर वय 55 वर्षे धंदा मजुरी रा. शरद पवार नगर, वलगाव ता.जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की दि. 14/10/2024 रोजी सकाळी 10/00वा. मी माझी मोटार सायकल पॅशन प्रो क्र. MH-27-AB-1278 ने शेतात गेलो मोटार सायकल रोड वर उभी करुन मी शेतात पायदळ गेलो मी दुपारी 04/30वा. गाडी ठेवलेल्या ठिकाणी परत आलो असता माझी मोटार सायकल दिसुन आली नाही. मी आजुबाजुला पाहणी केली मिळुन आली नाही. मी आज पावेतो माझे गाडीचा शोध घेतला मिळुन आली नाही. माझी गाडी फॅशन प्रो दुचाकी क्र. MH-27-AB-1278 कि.अं. 20,000/- रुपये लाल पट्टा असलेली कोणी तरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. करीता रिपोर्ट देत आहे. |

प्राणांकीत अपघात

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | जखमी व्यक्तीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे वलगाव अप क्र. 308/2024 कलम 281, 106(2) BNS R/w 134,184 M.V. Act. | टाकरखेडा ते साऊर रोड वर | दि.19/10/2024 चे 21/00 वा. ते 20/10/2024 चे 07/00वा. दरम्याण<br><br>दाखल दि. दि.20/10/2024 चे 20/44 वा. | प्रकाश शामराव चव्हाण वय 44 वर्ष व्यवसाय – शेतमजूरीरा. साऊरता.भात कूली जि.अमरावती | विलास शामराव चव्हाण | हकीकत अशा प्रकारे आहे की. दि.20/10/2024 रोजी सकाळी 07.00 वा. दरम्यान सुरेंद्र डहाके रा. साऊर याचा मला फोन आला. त्यांनी मला फोन वरून सांगीतलेकी तुझ्या भावाचा टाकरखेडा साऊर रोड वर अँक्सिडंट झाला आहे. तुझा भाऊ रोड चे बाजूला पडला आहे. अशी माहीती मिळाल्यावर मी व माझे सोबत माझे घरचे सर्व नातेवाईक आम्ही टाकरखेडा साऊर रोडवर जावून पाहले असता टाकरखेडा येथील बबलू मास्तर यांचे शेता जवड रोड चे वाजूला माझे भावाची मोटारसायकल उभी होती. मी जवड जावून पाहले असता माझा माऊ विलास हा रोडचे बाजूला बेहोश पडले ला होता. त्याचे डोक्याला उजव्या बाजूला मार लागला होता. तसेच उजव्या खांद्याला मार लागला होता. त्याचा उजवा पाय तुटलेला होता. माझे भावाचे शरीराला उजव्या बाजूला आनखी भरपूर मार लागला होता. मोटार सायकल सुध्दा ही उजव्याबाजूने चचपकले ली होती. तेथे भरपूर लोक जमले होते. टाकरखेडा येथील पोलिस पाटील यांनी पोलिसांना फोन केला. काही वेळात तेथे वलगांव येथील पोलिस आले. पोलिसांनी पंचनामा करून माझे भावाला इर्विन दवाखाना येथे घेवून गेले. तेथे डॉक्टरांनी तपासून सांगीतले की माझा भाऊ हा मरन पावला आहे. मोटार सायकल ने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | टाकर खेडा येथून साऊर येथे जात असताना कोण्या तरी अज्ञात वाह्नाने माझे भावाचे मोटार सायकलला ठोस मारली. अपघाता मध्ये गंभीर मार लागून माझा भाऊ मरन पावला आहे. करीता मी पोलिस स्टेशनला रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन गुन्हा सदरचा दाखल |

अपघात

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा अप नं. ६३९/२४ कलम २८१ BNS प्रमाणे | बडनेरा | घ ता वेळ - दि. २०/१०/२४ चे १८.०० वा ते २१/०० वा दा ता वेळ - दि. २०/१०/२४ चे २०.५८ वा | सर तर्फे पोउपनी सर्जेराव सानप पोस्टे बडनेरा | आकाश अनंतराव भारती वय २८ वर्ष रा अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्र. MH-२७- ४९४८ हा अपघात होवुन इतर नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल या प्रकारे हयगईने व बेदकारपने चालवितांना मिळुन आला वरून सदर आरोपीचे कृत्य कलम २८१ BNS प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| २ | बडनेरा अप नं. ६४०/२४ कलम २८१ BNS प्रमाणे | बडनेरा | घ ता वेळ - दि. २०/१०/२४ चे १८.०० वा ते २१/०० वा दा ता वेळ - दि. २०/१०/२४ चे २१.१५ वा | सर तर्फे पोउपनी सर्जेराव सानप पोस्टे बडनेरा | अंकुश अशोकराव रंगारी वय २७ वर्ष रा हरीदासपेठ बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्र. MH-३१ सिडी ६२९४ हा अपघात होवुन इतर नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल या प्रकारे हयगईने व बेदकारपने चालवितांना मिळुन आला वरून सदर आरोपीचे कृत्य कलम २८१ BNS प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | बडनेरा अप नं. ६४१/२४ कलम २८१ BNS प्रमाणे | बडनेरा | घ ता वेळ - दि. २०/१०/२४ चे १८.०० वा ते २१/०० वा दा ता वेळ - दि. २०/१०/२४ चे २१.३३ वा | सर तर्फे पोउपनी सर्जेराव सानप पोस्टे बडनेरा | मोबीन अब्दुल रफिक सौदागर वय ३२ वर्ष रा बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्र. MH-२७- सि एन ७७३१ हा अपघात होवुन इतर नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल या प्रकारे हयगईने व बेदकारपने चालवितांना मिळुन आला वरून सदर आरोपीचे कृत्य कलम २८१ BNS प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र | HDFC बँक रवी स्वीट मार्ट | दिनांक १६/१०/२४ चे ११.३० वा दाखल ता वेळ दिनांक | महेन्द्र मनोहरराव पेठे वय ५० वर्ष लक्ष्मी नगर | ऑटो रिक्षा क्र MH २७ BW १०६१ चा चालक | हकीक्त अशा प्रकारे आहे की फिर्यादिचा भाऊ हे देनंदिन कांमा करीता त्याची दुचाकी क्र MH २७ AL ८८८९ या गाडीने जात असताना HDFC बँक रवी स्वीट मार्ट जयस्तंभ समोर जात असताना विरुध्द दिशेने आलेल्या मालवाहु आटो क्र MH २७ BW १०६१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३९९/२४ कलम २८१, १२५(अ)BNS सह कलम १३४ मो वा अधि. | जयस्तंभ समोर अमरावती | २०/१०/२४ चे १७.३१ वा | लहेराबाबा मंदिरा जवळ अमरावती | | चा चालकाने भरधाव वेगाने येवुन धडक मारल्यामुळे त्याना धडक मारल्यामुळे गंभार दुखापत झाली त्याना घटनस्थळावरील इसमानी उचलुन इर्विन दवाखाना येथे नेले तेथुन पुढ़ील उफचारा करीता लाहेची दवाखाना येथे भरती के ले व पुढील उपचार सुरु आहे त्याना १५ टाके लागले आहे अशा फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

ईतर

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप. न. ८५८/२०२४ क ४,२५ आर्म अँक्ट | लुंबीनी नगर चौक ते जुना बायपास रोड अमरावती | दि. २०/१०/२०२४ चे १९/१५ वा. दाखल ता वेळ - दि. २०/१०/२०२४ चे २३/३८ वा. | पोहेकाँ. योगेश श्रीवास ब.न. १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | बिट्टु उर्फ रुपेश विनोद वानखडे वय २१ वर्ष रा. रेखा चौधरी यांच्या घरी भाडयाने पंचशील नगर, अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टाँप सह पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की एक इसम हा हातात चाकु घेवुन येणा-या जाणा-या लोकांमध्ये नमुद घटना ता वेळी व ठिकाणी दहशत निर्माण करीत आहे अश्या माहीती वरुन पंचासह घटनास्थळी जावुन नमुदआोपी यास ताब्यात घेवुन त्याच्या पासुन - एक धारदार लोखंडी पात्याचा चाकु कि.अ.३००/- रुपयाचा चाकु जप्त करण्यात आला यातील ारोपी याने मा. पोलीस आयुक्त सा. यांचे जारी केलेल्या कलम ३७(१)(३) महा. पोलीस कायदा चे इल्लघन करुन हातात चाकु घेवुन फिरतांना मिळुन आला ऱ्या फिच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोठाणे बडनेरा अप क्र ६३८/२०२४ कलम १४२ महा पोलीस कायदा सहकलम ४,२५ शस्त्र अधिनियम | आरोपीचे राहते घर रेल्वे स्टेशन रोड नवी वस्ती बडनेर | दि १९/१०/२०२४ चे २३/३० दाखल दि २०/१०/२०२४ चे ०३/४९ वा | ASI प्रमोद गुडधे ब.नं.२७७ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | शेख सलमान शेख सलिम वय २८ वर्षे रेल्वे स्टेशन रोड नवी वस्ती बडनेरा | हकिकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा मा.पो.उप.आ..सा.परि.१ अमरावती शहर यांचे आदेशक्र.पोउपआ/परि.-१/तडीपार/१८४७/२०२२/दि.२७.१०.२०२२नुसार दोन वर्षाकरिता अमरावती शहर व जिल्ह्यामधुन तडीपार असतांना नमुद तडीपार इसम याने अमरावती शहरात कोणताही परवानगी आदेश न घेता मा.पो.उपआयुक्त सा. यांचे आदेशाचे आदेशांचे उल्लंघन करुन घटनास्थळावर फिरतांना मिळुन आला. वरुन सदर आरोपीचे कृत्य कलम १४२, म.पो.का सहकल् ४,२५ शस्त्र अधिनयम प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | , पो.स्टे. राजापेठ अप क्र. ५९९/२४ कलम १४२ मपोका | अमरावती | दि. १९/१०/२४ चे २२.५० ते २३.२० वा दरम्यान दा. ता. वेळ दि. २० /१०/२४ चे ११.४५ वा | सरतर्फे पोहेका मनिष करपे बनं. १५२० पोस्टे राजापेट | अक्षय भास्कर देवीकर वय २३ रा. अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पोस्टाफ सह मिळालेल्य माहिती वरुन तडीपार इसम याला ताब्यात घेण्यात आले नमुद इसम हा मा. पो. उपायुक्त परी मं. २ अम. याचे कार्यालयीन आदेश क्र पोउपआ / परी म२ / तडीपार /०२/२४ दि. ०४/१/२४ अन्वये अमरावती ग्रामीण/ अमरावती शहरातुन एक वर्षा करीता तडीपार इसम याला प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये येण्याची परवानगी बाबत विचारले असता तृयाचेकडे कोनतीही परवानगी नसल्याचे सांगीतले वरुन नमुद आरोपी विरुध्द कलम १४२ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल |

## प्रोव्हिशन

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे फेजरपुरा अमरावती शहर | अप क्र ८५५/ २०२४ कलम ६५ [फ] ,(ड)महा. दा. का. | प्रोव्हीशन | पारदीबोडा राजुरा अमरावती | दि. २०/१०/ २०२४ चे ०७ /२५ वा | दि. २०/१० /२०२४ चे १२/२२ वा | सरतर्फे सुभाष पाटील ब न १२८० पोस्टे फ्रेजरपुरा अम,शहर | सेकनबाबु पैजन पवार वय ६५ वर्ष रा अमरावती | पोहेकॉ सुभाष पाटील ब न १२८० पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि गुप्त बातमीवरून खात्रीलायक माहीती प्राप्तवरून नमुद घ ता वेळ व ठिकाणी पोस्टे व पंचाच्या मदतीने आरोपीवर प्रोव्ही रेड केली असता आरोपीच्या ताब्यातुन सहा नग प्लास्टीक ड्रूम ज्यामध्ये प्रत्येकी २००लीटर मोहमाच सडवा असा एकुण १२००रू लीटर मोहमाच सडवा कि अं ४२०००रू व डूं ची प्रत्येकी कि अ १००० असे ६ड्रूम किं ६०००रू तसेच दोन प्लॉंस्टीक डपकी मध्ये प्रत्येकी २० लिटर गावटी दारू एकुण ४००० रू दोन प्लॉंस्टीक डपकी कि अ १०० रू असा एकुण माल ५२१००रू चा मोहमाच सडवा गावठी हातभट्टीची दारू व साहित्य माल प्रोव्ही माल जप्त करण्यात आला अशा फिर्यादी च्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे फ्रेजरपुरा | अप क्र ८५६/ | प्रोव्हीशन | एक महीला | दि. २०/१०/ | दि. २०/१० | पोहेकॉ. योगेश | एक महीला अमरावती | पोउपनि. महाजन पो | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टे हद्दीत पेट्रोलींग रकरीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अमरावती शहर | २०२४ कलम ६५(ई) म.दा. का | | हीचे राहते घरासमोर अमरावती | २०२४ चे १७/३० वा | /२०२४ चे २०/३३ वा | श्रीवास ब.न. १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | | स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | माहीती मिळाल्यावरुन यातील एक महीला हिच्या वर तिच्या राहत्या घरासमोर जावुन प्रोव्ही रेड केली असता तिच्या ताब्यातुन घटनास्थळावरुन पंचासमक्ष २३ नग देसी दारु पावट्या ९० एम एल च्या कि.अ.९२०/- रुपयाचा प्रोवही माल जप्त करण्यात आला अश्या फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप क्र ८५७/२०२४ कलम ६५(ई) म.दा. का | प्रोव्हीशन | राहुल नगर समाज मंदीर गल्ली बिच्छु टेकडी अमरावती | दि. २०/१०/२०२४ चे १८/४५ वा | दि. २०/१०/२०२४ चे २१/०७ वा | पोहेकाँ. योगेश श्रीवास ब.न. १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | जमीर खाँन वल्द बिस्मील्ला खाँन वय २६ वर्ष रा. अमरावती | पोउपनि. महाजन पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टे हद्दीत पेट्रोलींग रकरीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाल्यावरुन यातील आरोपीता वर प्रोव्ही रेड केली असता त्याच्या ताब्यातुन घटनास्थळावरुन पंचासमक्ष ३१ नग देसी दारु पावट्या ९० एम एल च्या कि.अ.१२४०/- रुपयाचा प्रोवही माल जप्त करण्यात आला अश्या फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | बडनेरा | अप नं. ६४२/२४ कलम ६५ ई म.दा.का | अवैध्दरित्या दारु विक्री | मलकापुर ते पांढरी रोड वर | दि. २०/१०/२४ चे १९.१५ वा | दि. २०/१०/२४ चे २२/४६ | सर तर्फे पो.हे.का. रोशन निसंग, ब.न. ९४५, पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. | रुपेश मनोहराव तायडे वय ३८ वर्ष रा मलकापुर ता जी अमरावती | | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना ११ नग देशी दारू टँगो पंच च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. ८२५/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | नांदगाव पेठ | अप क्र. ३६७/२४ कलम ६५ (क),(ड)(फ) म.दा.का. | अवैद्य दारु विक्री. | ग्राम शेंदोळा बु | २०/१०/२४ चे ९.४०वा | २०/१०/२४ चे १२.३४वा | सरतर्फे सपोनी रितेश राउत पो. स्टे. नांदगाव पेठ | सुरेश मोतारीम वाघ वय २३ वर्षे रा.शेदोळा बु ता.तिवसा जि. अमरावती | सरतर्फे सपोनी रितेश राउत पो. स्टे. नांदगाव पेठ दि २०/१०/२०२४ चे ०९/४० वा | हकिकत अशा प्रकारे की फि. यांची प्रो रेड ड्युटी असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की नमुद घ. ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा दारु विक्री करीत असतांना मिळुन आला. सदर आरोपी चे घराचे पाठीमागे एक लोखंडी ड्राम मध्य १०० लिटर मोह फुल सडवा कि.अ.८००० रु.चा माल मिळुन आला.एक सिए सैम्पल करिता १८० एम,एच.काचेच्या शिशित घेवुन बाकी माल जागेवर नष्ट करण्यात आला. वरुन फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| 6 | पोलीस स्टेशन नागपुरी गेट | अप क्र. 390/2024 कलम 65 (ई) मदका | प्रोव्हीशन | अकबर नगर नाल्याच्या पुलावर ईलेक्ट्रीक डिपी जवळ अमरावती | दि. 20/10/2024 चे 18/30 वाते 19/20 वा | दि. 20/10/2024 चे 21/24 वा | पो हे का शिवनाथ आंधळे ब. न. 494 पोलीस स्टेशन नागपुरी गेटअमरावतीशहर | शमशेर शहा मुस्ताक शहा वय 28 वर्ष रा. अबुतल हामज्जीद जवळ अकबर नगर अमरावती आरोपी-समज पत्रावर | पोउपनि पंकज गुप्ता पोलीस स्टेशन नागपुरी गेट अमरावती शहर २) पो हे का शिवनाथ आंधळे ब. न. | **हकीकत अशा प्रकारे आहे. यातील फिर्यादी हे पो. स्टॉफ सह पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असता नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक माहीती मिळाली की एक ईसम** अकबर नगर नाल्याच्या पुलावर ईलेक्ट्रीक डिपी जवळ अमरावती येथे अवैध्यरित्या देशी दारुची विक्री करीत आहे. अशा माहीती वरुन आरोपीयांच्या वर पो. स्टॉफ व पंचा सह जावुन रेड केली असता दारु विक्री करणा-या ईसमास जागीच पकडुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शमशेर शहा मुस्ताक शहा वय 28 वर्ष रा. अबुतल हा मज्जीद जवळ अकबर नगर अमरावती **असे सागीतले त्याचे ताब्यातुन** 19 नग देशी |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | 494 पोलीस स्टेशन नागपुरी गेटअम रावतीशहर | दारु टँगो पंच पावत्या किमंत 1,330/- रु चा माल जप्त केला सदर आरोपी चे कृत्य कलम 65 (ई) मदका प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| 7 | पोस्टे वलगाव | **अप क्र. 307/2024 कलम 65 (ई) म.दा. का.** | अवैद्य रित्या देशी दारु ची विक्री करणे | **– पुसदा** | **दि. 20/10/2024चे 18/30 वा.** | **दाखल दि. 20/10/2024 चे 19/57 वा** | **पो.उप. नि दादु बुडा दहीकर ब.नं. 919 पो.स्टे.वलगाव, अमरावतीशहर** | **अमर मनोज गवई वय 19 वर्षे रा. पुसदा ता.जि.अमरावती** | | **हकिकत अशा प्रकारे आहे कि पोस्टे हजर इयु असतांना. 09/00वा. ते रात्री 21/00 वा. पो.,स्टे. ला हजर इयुटी असतांना अंदाजे 17/10वा. दरम्यान गुप्त बातमीदार कडुन माहीती मिळाली की, ग्राम पुसदा येथे एक इसम पुसदा पुलाचे नाल्या जवळ अवैध्द रित्या ने बिनापरवाना देशी दारूची विक्री करीत आहे. अशा गोपणीय माहीती वरून आम्ही सोबत पो.कॉं. निलेश घाटे ब.नं. 831 पो.स्टे. वलगाव असे मिळाले ल्या माहीती प्रमाणे पो.स्टे. मधुन खाजगी वाहनाने रवाना होऊन ग्राम पुसदा बस स्टॉफ येथे जाऊन पंचाना बोलवुन पंचाना प्रो.रेट बद्दल माहीती देऊन आम्ही पो. स्टॉफ , पंच असे खाजगी** |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | वाहन दुर ऊभे करुन लपत छपत जाऊन पाहणी केली असता एक ईसम पुसदा पुलाचे नाल्या जवळ अवैध्द पणे बिना परवाना देशी दारूची विक्री करीत असतांना दिसुन आला त्याचे वर सायंकाळी 18/30वा. दरम्यान आम्ही पो.स्टॉ फ व पंचा सह नमुद ईसमावर प्रोव्ही. रेट केली असता पोलिसांची चाहुन लागताच दारु पिणारे लोग पळुन गेले व दारु विक्री करणारा ईसम याला जागीच ताब्यात घेऊन पंचा समक्ष त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नांव अमर मनोज गवई वय 19 वर्षे रा. पुसदा ता.जि.अमरावती असे सांगीतले त्याचे ताब्यातील प्लँस्टीकची पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारु बाँबी संत्रा 90 मि.ली. च्या 10 नग प्रत्येकी किंमत 35 रु. प्रमाणे असा एकुन 350/- रु. चा माल मिळुन आल्याने सदरचा माल जसी पंचनाम्या प्रमाणे पंचा समक्ष जप्त केला. अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदर |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | चा गुन्हा दाखल |
| ८ | राजापेठ | अप. क्र . ५९८/२४ क ६५(ई) मदाका | प्रोव्हीशन | वसंतराव नाईक झोपडपटटी अमरावती | दि १९/१०/२४ चे २२.१० वा ते २२.४० वा | दा ता वेळ २०/१०/२४ चे १०.४९ वा | सरतर्फे पोहेका मनिष करपे बनं. १५२० पोस्टे राजापेठ अमरावती | मनोज प्रमोद खंडारे वय ३८ रा. वसंतराव नाईक झोपडपटटी अमरावती | | थोकक्यात हकीकीत अशी की नमुद घटना ता वेळी व ठिकाणीृ यातील फि याना मिळालेल्या गुप्त माहितीवर पंचासमक्ष प्रोव्ही रेड केली असता आरोपी याचे ताब्यातुन 14 नग देशी दारू ९० एम एल च्या पावटया प्रत्येकी ३५ रु. कि अं. ४९० रु. एक प्लास्टीक पिशवी कि अं १० रु. असा एकुन ५०० रु चा माल मिळुन आला सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन आरोप विरुध्द ६५(ई) मदाका अन्वये गुन्हा दाखल |
| ९ | राजापेठ | अप क्र ६००/२४ क ६५(ई) मदाका | प्रोव्हीशन | मारोती नगर अमरावती | दि २०/१०/२४ चे ११.३०वा ते २२.४० वा | दा ता वेळ २०/१०/२४ चे १३.२१ वा | सरतर्फे पोहेका सागर सरदार बनं १५८ पोस्टे राजापेट | गुड्डु उर्फ साहिल दिपक निचळ वय २४ रा. मारोती नगर अमरावती | | थोकक्यात हकीकीत अशी की नमुद घटना ता वेळी व ठिकाणीृ यातील फि याना मिळालेल्या गुप्त माहितीवर पंचासमक्ष प्रोव्ही रेड केली असता आरोपी याचे ताब्यातुन १२ नग देशी दारु बॉबी संत्रा १८० मिली चे कि अं. ९६० रु.चा माल मिळुन आला सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन आरोपी विरुध्द ६५(ई) मदाका अन्वये गुन्हा दाखल |
| १० | राजापेठ | अप क्र ६०१/२४ क ६५(ई) मदाका | प्रोव्हीशन | माया नगर अमरावती | दि २०/१०/२४ चे १५.३० वा ते १६-१० वा | दा. ता .वेळ २०/१०/२४ चे १७-५३ वा. | सरतर्फे पोहेका मनिष करपे बनं १५२०, पो.स्टे .राजापेठ अमरावती | संतोष अंबादास कैथवास वय ४६ रा. मायानगर अमरावती | | थोडक्यात हकीकत अशी की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फि. याना मिळालेल्या गुप्त माहितीवर पंचासमक्ष प्रोव्ही रेड केली असता आरोपी याचे ताब्यातुन १४ नग देशी दारु टॅन्गो पंच कंपनीच्या पावट्या ९० मिली प्रत्येकी ३५ रूपयाच्या असा कि अं. ४९० रु. माल मिळुन आला सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन आरोपी विरुध्द ६५(ई) मदाका अन्वये गुन्हा दाखल |
| ११ | राजापेठ | अप क्र ६०२/२४ क ६५(ई) मदाका | प्रोव्हीशन | अमरावती | दि २०/१०/२४ चे १६.३० वा ते १६-५० वा | दा. ता. वेळ २०/१०/२४ चे १९-०४ वा. | सरतर्फे पोहेका मनिष करपे बनं १५२०, पो.स्टे .राजापेठ अमरावती | एक महीला | | थोडक्यात हकीकत अशी की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फि याना मिळालेल्या गुप्त माहितीवर पंचासमक्ष प्रोव्ही रेड केली असता एक महीला आरोपी याचे ताब्यातुन्४८ नग देशी दारु टॅन्गो पंच कंपनीच्या पावट्या ९० मिली प्रत्येकी ३५ रूपयाच्या असा कि अं. १६८० रु. माल मिळुन आला सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन आरोपी विरुध्द ६५(ई) मदाका अन्वये गुन्हा दाखल |
| १२ | पो. स्टे कोतवाली | अप क्र ४००/२४ कलम ६५ | प्रोव्हीशन | समाधान नगर अमरावती | गु घ ता वेळ दि २०/१०/२४ | गु दा ता वेळ दि २०/१०/२ | सपोउपनि रंगराव जाधव ब न | रुषीकेश राजेश तायडे वय २४ वर्ष रा समाधान | | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील यांची १४.०० वा ते २१.०० वा ड्युटी असतांना मिळालेल्या खात्रीदायक बातमीवरुन एक ईसम आपल्या हातात एका प्लास्टीक च्या |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (ई) मदाका | | | चे १९.२५ वा | ४ चे २१.१४ | ९२१ पो. स्टे कोतवाली अमरावती | नगर अमरावती | | पिशवीमधे अवैद्यरित्या देशी दारु विक्री करीत आहे अशा मिळालेल्या बातमीवरुन पोस्टाप व पंचासमक्ष फिर्यादी हे नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी गेले असता एक ईसम आपल्या हातात एक प्लस्टीकची पिशवी घेवुन मिळउन आला त्यास पंचास्मक्ष विचारपुस केली असता त्याने आपले रुषीकेश राजेश तायडे वय २४ वर्ष रा समाधान नगर अमरावती असे सांगितले त्याचे ताब्यातील प्लास्टीकच्या पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामधे १५ नग देशी दारु ड्युट कंपनीच्या पावट्या प्रत्याकी १८० एम एल किंमत १२००/- रुपये प्रोव्ही माल मिळुन आला. त्यास मालमत्ता परवाना विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले सदर आरोपीचे कृत्य हे कलम ६५(ई) मदाका दारुबंदी कायद्याप्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशावरुन सदरचा गुन्हा दाखल |
| १३ | पो स्टे खोलापुरी गेट | अप क्र 232/2024 कलम 65 (ई) भारतीय न्यायसंहीता 2023 बीएनएस | प्रोव्हीशन | महाजनपुरा अमरावती | घटना ता.वेळ 20/10/24 चे 19/15 वा. | दाखल ता.वेळ 20/10/24 चे 21/15 वा | पोहेकॉ राम भगवानजी लॉखडे ब.न. 1114 पो स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर | राहुल रूपेश सावरकर वय 22 वर्ष धंदा- मंजुरी | | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी पेट्रोलींग दरम्यान गुप्त माहीतीवरून नमुद घटना ता.वेळी आरोपीवर प्रोव्हीशन रेड केली असता तिच्या ताव्यात पंचासमक्ष एका पांढ-या रंगाच्या प्लास्टीकचे थैली त्यामध्ये देशी दारू टॅंगो पंच कंपनीच्या प्रत्येकी 180 मि.ली.च्या 08 नग सिलबंद पावट्या प्रत्येकी किंमत 70/- रूपये असा एकुण किमत 560/- रूपये चा माल मिळून आल्याने ताब्यात घेवुन सदरचा गुन्हा दाखल |

अकस्मात मृत्यु

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा मर्ग क् ७९/२४कलम १९४ जाफौ | मासोद<br>दि २०/१०/२४ ०७.३० वा<br>दि २०/१०/२४ चे १२.३१ | सुरेश शंकरराव शेखदार वय ६३ वर्ष रा मासोद | एक महीला | हकीकत असाप्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी पोस्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला की त्यांचे पती हे मागिल नउ महिन्यापासुन मासोद येथे चौकीदार म्हणुन काम करीत होते अदुन मधुन त्यांचे कडे जाणे येणे होते दि २०.१०.२४ रोजी सकाळी ०७.३० वा दरम्यान फिर्यादीला माहिती दिली की तिचे पती जमीनीवर तोंडावर खाली पडुन मरण पावले अशी माहिती मिळताच फिर्यादी हे घटनास्थळी गेले तेव्हा तिचे पती खाली जमिनीवर उबडे पडलेले होते त्यांना दारू व गांजा पिण्याचे व्यसन होते ते चक्कर येवुन खाली पडुन मरण पावले अशा फिर्यादीचे जबानी रिपोरटवरून सदरचा मर्ग दाखल |
| १ | पो.स्टे. रजापेठ मर्ग नं ८४/२४ कलम १९४ बि.एन. एन. एस. | भक्ती धाम समोरील डॉ. अग्रवाल कडे जाणा-या रोडवर अमरावती<br>घ.ता.वेळ - दि. १५/१०/२४ चे २३.३०वा<br>दा. ता. वेळ<br>दि. २०/१०/२४ चे १४.३० वा | निलेश समाधान तायडे वय ३५ रा. साई नगर अमरावती | त्र्यंबक भिकाजी शेंडे वय ७५ रा. रा. निंबाडी ता. तेल्हारा | नक्कल बयाण कॅम्प पो.स्टे. राजापेठ दि. १९/१०/२४ त्र्यंबक भिकाजी शेंडे वय ७५ रा. रा. निंबाडी ता. तेल्हारा जि. अकोला यांनी विचारल्या वरुन सांगितले की साई नगर येथे माझी बहिण कुटुंबासह राहते तिला एक मुलगा निलेश आहे तो प्रायव्हेट मध्ये कॅम्पुटर ऑपरेटरचे काम करतो दि. १६/१०/२४ रोजी माझा जावाई याने फोन करुन सांगितले की माझा मुलगा निलेश गाडीवरुन पडला तो रेडीयंट हॉस्पीटल येथे भरती आहे . मी लगेच अमरावती येथे आलो जावयांनी सांगीतले दि. १५/१०/२४ रोजी रात्री ११.३० वा दरम्यान घरी येत असतांना त्यांची गाडी स्लीप झाल्याने त्याच्या डोक्याला मार लागला त्याला ईवीन येथे नेले तेथुन रेडीयंट हॉस्पीटल येथे आनले त्याचा उपचार सुरु आहे. दि. १९/१०/२४ रोजी सायंकाळी ६.०० वा माहिती पडले की माझा भाचा निलेश उपचारा दरम्यान मयत झालेला आहे त्याच्या मयता बाबत मला संशय किंवा तक्रार नाही. सदरचा मर्ग दाखल |